दै. पुण्यनगरी दि. 5.6.25

# कत्तलीसाठी बाळगलेल्या ११ बैलासह दोघे जण ताब्यात

- इतवारा पोलिसांची धडक कारवाई
- 3.७० लाखांचा मुद्देमाल जप्त

**नांदेड/ प्रतिनिधी**

जुन्या नांदेड भागात निर्दयतेने गोवंश बाळगणाऱ्यांविरुध्द पोलिसांनी धडक कारवाई केली आहे. ११ बैल जप्त करुन दोघांना पकडले आहे.

जुन्या नांदेड भागातील इस्लामपुरा परिसरातील अझीम किराणा जवळ शेख रहीम शेख खाजा ६२ याने विनापरवाना गोवंश जनावर बाळगले. त्यास अतिशय निर्दयतेने बांधून ठेवले होते. हे कळाल्यावर पोहेकाँ धीरजकुमार कोमुलवार यांनी तेथे जावून या बैलाची सुटका केली आणि आरोपी शेखला ताब्यात घेतले. हा बैल ५० हजार रुपये किमतीचा आहे. कोमुलवार यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन दि. २ जून रोजी इतवारा पोलिस ठाण्यात गुरनं १८४/२५ कलम ५ (ब), ९ महाराष्ट्र प्राणी संरक्षण नुसार नोंद करण्यात आली आहे. पुढील तपास पोहेकाँ वाजीद करीत आहेत.

जुन्या नांदेड भागातीलच इस्लामपुरा येथे रेल्वे गोदामामागे काही गोवंश निर्दयतेने बांधल्याची माहिती मिळाल्यावर दि. ३ जून रोजी मध्यरात्री पोहेकाँ मोहन हाके यांनी छापा मारला. या छाप्यात विनापरवाना व अतिशय निर्दयतेने बांधलेले १० बैल आढळून आले. या बैलांची सुटका करुन आरोपी मोहम्मद जाकेर मोहम्मद फारुख, रा. साईनगर इतवारा नांदेड याला ताब्यात घेतले. या १० बैलांची किंमत ३ लाख २० हजार रुपये आहे. हाके यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन इतवारा पोलिस ठाण्यात गुरनं १८५/२५ कलम ५(ब), ९ महाराष्ट्र प्राणी संरक्षण कायदा सह कलम ११ प्राण्यांना क्रुरतने वागविण्याचा प्रतिबंध अधिनियम दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास पोहेकाँ वाजीद करीत आहेत.

दै. गोदातीर

# अवैध कत्तलीसाठी जाणाऱ्या ११ गोवंशांना जीवदान



**नांदेड (प्रतिनिधी)-** ईदच्या पार्श्वभूमीवर पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार यांच्या मार्गदर्शनाखाली शहरात गोवंश कत्तल होणार नाही याची पोलिसांकडून दक्षता घेतली जात आहे. कत्तलीसाठी जाणाऱ्या ११ गोवंशाला इतवारा पोलीस निरीक्षक रणजीत भोईटे व त्यांच्या पथकाने जीवदान दिले आहे.

पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार यांनी गुन्हेगारांना आळा घालण्याच्या पार्श्वभुमीवर अवैध जनावरे वाहतूक करणाऱ्या व्यक्तीविरुध्द कारवाई करण्या बाबत सर्व पोलीस ठाण्यांच्या प्रभारी अधिकाऱ्यांना आदेश दिले होते.

दरम्यान इस्लामपुरा देगलुर नाका भागात कांही इसम गोवंश जातीचे जनावरे टिनपत्र्याच्या शेडमध्ये बांधून ठेवली असल्याची माहिती दि. २ जून रोजी इतवारा पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक रणजीत भोईटे व गुन्हे शोध पथकाला मिळाली. त्यानुसार इस्लामपुरा भागात जाऊन पाहणी केली असता इस्लामपुरा भागात वेगवेगळया ठिकाणी आरोपीतांचे ताब्यात असलेले गोवंश जातीचे ११ जनावरे ताब्यात घेण्यात आले.

त्यानंतर ती जनावरे पोलीस स्टेशन इतवारा येथे आणण्यात आली. आरोपी शेख रहीम शेख खाजा राहणार इस्लामपुरा नांदेड आणि मोहम्मद जाकेर मोहम्मद फारूक राहणार साईनगर इतवारा नांदेड या दोघांविरूध्द महाराष्ट्र प्राणी संरक्षण अधिनियम व भारतीय न्याय संहिता कायद्यान्वये दोन गुन्हे दाखल करण्यात आले. जप्त करण्यात आलेले एकुण ११ गोवंश जातीच्या जनावरांना गोशाळा येथे पाठविण्यात आले आहे.